# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २३२-२२** **दिनांक ३०/०७/२०२२**

## वाहन चोरी, जबरी चोरी व मोबाईल चोरी करणा-या आरोपींना अटक करुन एकुण ०८ गुन्हे उघडकीस-मध्यवर्ती गुन्हे शाखेची कामगिरी.

मिरा-भाईन्दर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विशेषत: वसई-विरार परिसरात वाहन चोरीच्या गुन्हयात वाढ होत असल्याने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सदर गुन्हयांवर आळा बसणेकरीता मार्गदर्शनात्मक सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे एक विशेष पथक नेमण्यात आले. त्यानुसार पेल्हार पोलीस ठाणेकडील गुरनं. ६१७/२०२२ भादंविक - ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा करीत होती.

सदर पथकाने तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या बातमीचे आधारे मोटार सायकल चोरी करणा-या इसमावर वसई पुर्व गौराईपाडा या परिसरात सतत दोन दिवस पाळत ठेवून सापळा रचुन दिनांक २५/०७/२०२२ रोजी इसम नामे राजेशकुमार शामकुमार जैस्वाल, वय २१ वर्षे रा. नालासोपारा पुर्व यास शिताफिने ताब्यात घेतले. त्याचे ताब्यातुन होंडा कंम्पनीची मो.सा. क्र. MH-48-AL-6956 व दोन मोबाईल मिळुन आले. सदर गुन्हा तपासास घेवुन त्याबाबत त्याचेकडे अधिक कौशल्यपुर्वक विचारपुस करता त्याने ते चोरी केल्याचे सांगीतल्याने त्यास अटक करुन मा. न्यायालयात कडुन पोलीस रिमांड प्राप्त करुन सदर गुन्हयाचे अनुषंगाने त्याचेकडे अधिक तपास करता त्याने एक रिक्षा व दोन मोटार सायकल असे काढुन दिल्याने त्याचेकडुन एकुण- १,२७,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरबाबत मिरा-भाईन्दर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात पोलीस ठाण्यातील रेकॉर्डची पडताळणी करता, वाहन चोरीचे- ०४ गुन्हे व मोबाईल चोरीचे- ०२ गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक/ दत्तात्रय सरक हे करीत आहेत.

तसेच दिनांक २९.०७.२०२२ रोजी मिळालेल्या बातमीनुसार मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदार यांनी मनवेल पाडा, विरार पुर्व येथे सापळा रचुन इसम नामे अभिषेक अरविंदकुमार यादव, वय २७ वर्षे व सचिन राकेश सिंग, वय २६ वर्षे, दोघे राहणार नालासोपारा पुर्व यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन जबरी चोरीचे गुन्हयातील ०२ मोबाईल व गुन्हा करतेवेळी वापरलेली मोटार सायकल असा एकुण-६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन जबरी चोरीचे - ०२ गुन्हे उघडकीस आणले आहेत. असे एकुण वाहन चोरी, जबरी चोरी व मोबाईल चोरी ०८ गुन्हे उघडकीस आणण्यात मध्यवर्ती गुन्हे शाखा यांना यश आले आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | पेल्हार पोलीस ठाणे | गुरनं.६१७/२०२२ भादंविसक - ३७९ |
| २ | नवघर पोलीस ठाणे | गुरनं.५२६/२०२२ भादंविसक - ३७९ |
| ३ | आचोळे पोलीस ठाणे | गुरनं.२२६/२०२२ भादंविसक - ३७९ |
| ४ | नालसोपारा पोलीस ठाणे | गुरनं.३१७/२०२२ भादंविसक - ३७९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | वालीव पोलीस ठाणे | गुरनं.७२७/२०२२ भादंविसक - ३७९ |
| ६ | तुळींज पोलीस ठाणे | गुरनं.१५३/२०२२ भादंविसक - ३८० |
| ७ | नालसोपारा पोलीस ठाणे | गुरनं.२०७/२०२२ भादंविसक - ३९२, ३४ |
| ८ | पेल्हार पोलीस ठाणे | गुरनं.६२/२०२१ भादंविसक - ३९२, ३४ |

सदरची कामगिरी श्री विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, (मुख्यालय), अती कार्य. पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) व श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, सपोनि/दत्तात्रय सरक, सपोनि/नितीन बेन्द्रे, सफौ/चंद्रकांत पोशिरकर, पोहवा/ गोविंद केंद्रे, राजाराम काळे, शिवाजी पाटील, पोअं/महेश वेल्हे, सुशील पवार, संग्राम गायकवाड, सतीश जगताप यांनी केलेली आहे.

------ ०००० ------